# बोरें

## ( कविता संग्रह )



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १४६०
क्र १४६०

REFBK-0011235
REFBK-0011235

मराठी ग्रंथ सं[illegible] ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २०९३२ वि ५१.०४
क्रमांक [illegible] नों. दि: ८-१-६१
१०८०

# वो रैं

( कविता - संग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

कवयित्री

**सौ. सुशीला बापट**

जी. ए.

REFBK-0011235

REFBK-0011235

किंमत अडीच रुपये

प्रकाशक
व्ही. आर. बापट,
बी. ए. (ऑनर्स)
२५२/१६ सदाशिव पेठ,
लिमयेवाडी, पुणें २

आवृत्ति पहिली
सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक
य. गो. जोशी
बी. ए.
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव : पुणें २.

## मनोगत

शबरीनें ज्या प्रेमभावानें श्रीरामाला बोरें अर्पण केलीं, त्याच प्रेमभावानें मी वाचकांना माझीं कवितारूपी बोरें देत आहें. वाचकांनींहि श्रीरामाप्रमाणेंच थोर अंतःकरणानें त्यांचा रसास्वाद घ्यावा, ही विनंती.

चंद्रकिरण बंगला,
२५२।१६ सदाशिव पेठ,
लिमयेवाडी : पुणें २.
१५ ऑगस्ट १९६०

**सौ. सुशीला बापट**




मराठी भाषेचे ईश्वर श्री ज्ञानेश्वरमहाराज
यांच्या पवित्र चरणीं सविनय अर्पण.

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पृष्ठ |
| --- | --- |
| **भाग १ ला—" मोठ्यांसाठीं "** | |
| १. शारदावंदन | ९ |
| २. नत तुझ्या पदीं माथा | १० |
| ३. बोरें | ११ |
| ४. माझी बाग | १३ |
| ५. भाऊबीज | १५ |
| ६. स्वप्न | १६ |
| ७. लोकमान्यांच्या स्मृतीस वंदन | १८ |
| ८. वसंतांतील पहांट | १९ |
| ९. पर्वतीवरील संध्याकाळ | २० |
| १०. पावसाळा | २२ |
| ११. सूर्य गेला भारताचा | २३ |
| १२. आई | २४ |
| १३. आहे आम्हांपाशीं मनोबळ | २५ |
| १४. बैलोबाचें मागणें | २६ |
| १५. कैकेयीस प्रभू रामचंद्राचें वंदन | २८ |
| १६. किती क्षुद्र मी विश्वापुढती अफाट ! | २९ |
| १७. सावळ्या बाळाची समजूत | ३० |
| १८. राम घरीं यायचे | ३१ |
| **भाग २ रा—" महिलांसाठीं "** | |
| १९. मुलीकडची विहीण | ३५ |
| २०. मुलाकडची विहीण | ३६ |
| २१. माहेराचं तिळवण | ३७ |
| २२. डोहाळे झोपाळ्यावरचे | ३९ |
| २३. डोहाळे उपवनांतले | ४१ |
| २४. डोहाळे चांदण्यांतले | ४३ |
| २५. डोहाळे कोवळ्या उन्हांतले | ४५ |
| २६. डोहाळे जेवणाचे | ४७ |
| २७. डोहाळे गमतीचे | ४९ |
| २८. पाळणा ( मुलाचा ) | ५२ |
| २९. पाळणा ( मुलीचा ) | ५३ |
| ३०. अंगाई गीत | ५५ |
| ३१. दौलत | ५७ |
| ३२. खोडकर बाळास | ५८ |
| ३३. मातृ-भोजन | ५९ |
| ३४. मंगलाष्टकें | ६० |

| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| **भाग ३ रा–" मौजेसाठीं "** | |
| ३५. बल्लवाचार्य | ६५ |
| ३६. निशा स्वप्न ! | ६६ |
| ३७. सासर-माहेर ! | ६७ |
| ३८. मलाच तें ठाऊक ! | ६९ |
| ३९. व्यापाऱ्यांचें गाणें ! | ७० |
| ४०. नव कारकुनाची नव रामरक्षा | ७१ |
| ४१. आधुनिक सावित्री | ७३ |
| ४२. आधुनिक लक्ष्मण | ७५ |
| ४३. आधुनिक लक्ष्मी | ७६ |
| ४४. आधुनिक जलभरण | ७८ |
| ४५. नव्या मनूंतील नवरा | ८० |
| ४६. गळ्याची शपथ | ८२ |
| ४७. गडे मी आलें माझ्या घरीं | ८३ |
| ४८. एकदां काय झालं ? | ८४ |
| ४९. सासर-माहेर ! | ८५ |
| ५०. व्हिटॅमिनें खा व्हिटॅमिनें– | ८६ |

| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| ५१. सद्गुण सुधा | ८८ |
| ५२. खाणावळ | ९० |
| ५३. इतरांशीं काय ? | ९१ |
| ५४. झुरळाचें भावगीत | ९२ |
| ५५. कोडें ! | ९४ |
| ५६. इंदूचें लग्न | ९५ |
| ५७. पावसाळा | ९६ |
| ५८. महत्त्वाकांक्षा ! | ९७ |
| **भाग ४ था–" माझ्यासाठीं "** | |
| ५९. ताईची आठवण | १०१ |
| ६०. आरोग्य हें धन | १०३ |
| ६१. उल्हासच्या ओव्या | १०४ |
| ६२. ती. जनूभाऊस | १०६ |
| ६३. चि. स्वाती परांजपे हिस शुभाशीर्वाद | १०८ |
| ६४. देवाचे ऋण | १०९ |
| **भाग ५ वा महाराष्ट्रासाठीं** | |
| ६५. श्री महाराष्ट्र गौरव गीत | ११३ |


* * *

# भाग १ ला

# मोठ्यांसाठीं

अनुक्रम ........
क्रमांक ........
नों. दि. ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२३४
शाखा (स्थळ प्रत)

१.

## शारदावंदन

संगमरवरी खडका मधुनी सरिता स्फटिकापरी
नवरत्नांचा चूर विखुरती लाटा खडकांवरी ।
दूरदूर उत्तुंग विलसती हिमशिखरें सुंदर
मावळतीचा सूर्य सजवितो सोन्यानें अंबर ।
वायूवरती बसुनि धांवतो सुगंध चोहीकडे
धरेवरीही, जलावरीही, फळाफुलांचें सडे ।
शिलेवरी शारदा विराजे अहा स्वप्न सुंदरी
निशिगंधाचा शुभ्र मनोरम किरीट शोभे शिरीं ।
वातावरणीं भरून राहिला वीणारव मंजुळ
वृक्षलता डोलती त्यासवें थुईथुई नाचे जल ।
सभोंवतीं हें कळप मृगांचे जमले वेडावले
उभारती हे मोर पिसारे, गान रंगीं रंगले ।
स्फटिकाची जपमाळ साजिरी, धवल वस्त्र त्यापरी
मौक्तिकमाळा गळा शोभती, कुंतल स्कंधावरी ।
तवसंगें ही पवित्र झाली जलें, उपवनें वनें
कवनें मज गावया स्फूर्ति दे, हेंच पदीं मागणे ।

* * *

२.

## नत तुझ्या पदीं माथा

आली शुभ कार्तिकाची, आज दुजी एकादशी
देह राहिला घरांत, मन गेले आळंदीसी ।

मनीं येती ज्ञानदेवा आज तुझ्या आठवणी
व्याकळुनि वाहे माझ्या लोचनांची इंद्रायणी ।

प्रेमभावें लोटला हा पहा तुझा भक्तमेळा
ज्ञानदेवा तुझ्यारूपें शान्ति पाहिली मी डोळा ।

ज्ञानेश्वरी गावोनिया तुवा भूषविली गीता
मराठीच्या प्रभो माझा नत तुझ्या पदीं माथा ।

# ३.

## बोरें

गेला तो नगराज हाय इथला, गेले तरू त्यासवें
गेले ते घनदाट वृक्ष अपुली घेऊन छाया सवें
गेल्या त्या सुकुमारशा वनलता, गेली फुलें कोमल
भृंगांचे मधु गुंजनांत रमले–गेले थवे शामल

✤ ✤ ✤

पंपा नामक ते सरोवर इथे होते अती निर्मल
तृप्तिदायक, शुभ्र ते जल–मधु होते किती शीतल
होते सारस हंस क्रीडत सुखें पृष्ठावरी ज्याचिया
होत्या ओतित गंध त्या कमलिनी पाण्यामध्यें त्याचिया

✤ ✤ ✤

गेले ते मुनिवर्य वृद्ध-त्यजुनी ‘ मातंग ’ की लोक हा
गेले शिष्य तसेच ते निघुनिया एकेक गेहा पहा
झाले निर्जन अन् भकास अवघे, ओसाड हो आश्रम
होती बाहत दीन भिल्लीण तिथे रामास आक्रंदुन

✤ ✤ ✤

होती कष्टत काननी, निशिदिनी, बैरागिनी योगिनी
होती गर्जत रामनाम वदनीं, द्या दर्शनाते म्हणि

झाले जीवन शून्य ! ती गढुनिया गेली प्रभू पूजनीं
एकाकी शबरी बसे प्रभुपथीं दृष्टी अशी लावुनी

✤ ✤ ✤

गेली पाऊलवाट ती पुसटुनी, होती अती रम्य की
गेले राम-सबंधू जेथुन पुढें शोधावया जानकी

काळाच्या उदरांत आज दडुनी गेले जरी सर्वही
बोरें भावमधूर मात्र उरली, सांगावया मर्महीं*

( * आयुष्य कितीही खडतर असलं, तरी देवावर श्रद्धा ठेवून आपलं कर्तव्य करीत राहिलं पाहिजे ! )

✤ ✤ ✤

४.

## माझी बाग

इवलीशी मधे कुटि, भवताली बाग छान
माझा आनंदाचा ठेवा, हरपून जाई भान

‘ झाडें वेली ’ नव्हेत ह्या ! ‘ कृतज्ञता ’ साकारली
जळ शिंपीता इवलें, देती फुलांच्या ओंजळी !

वृक्षलता स्थीर उभे, एके जागी, वाटे जगा
बाई कामाची वनश्री ! क्षण दवडीना उगा !

जगावेगळाच ह्यांना लागलेला छंद
काळ्याशार मातीतून देती शोधुनी सुगंध

कालीकाळी धरित्री ही तिच्या पोटीं नवरत्नें
वृक्षवेली देती मला, शोधुनिया बहू यत्नें

गोकर्णीला सांपडले अहा निळे नीलमणि
हिरे गहिरे शोभती जाईजुईच्या हो कर्णि

पारिजातकानें देठी लाल पोवळी ओविली
तुळशीनें मंजीरींत मोत्यें मजेनें खोविली

गणेशाची वेल परी कमालच करी बाई
माणिकांच्या राशी तिनें जमविल्या ठायीं ठायीं

मुकूटांत सोनटक्का सोनियाची फुलें खोवी
पाचू रत्नांचा मुलामा तगर ही पाना लावी

रातराणी सुगंधाची सदा कारंजी उडवी
पानोपानीं अत्तराच्या कुप्या मोगरी दडवी

वनसंजीवन असा मध भरूनिया पेले
निशिगंध देई मला मन मोहुनिया गेले

गंध, रंग, मध आणी बाग साध्या मातीतून
माझा आनंदाचा ठेवा, भान नेई हरपून

* * *

५.

## भाऊबीज

(तेव्हां आणि आतां)

बालपणींची ती आठवते बीज । आज ही काळीज । हेलकावे ॥१॥
दारिद्र्य घरांत होते मूर्तिमंत । मातेच्या प्रेमांत । जाणवेना ॥२॥
आली दिपवाळी आली भाऊबीज । शृंगार ना साज । सदनांत ॥३॥
आला भाऊराया ओवाळिले त्याला । रुपया वाजला । ताम्हनांत ॥४॥

* * *

"परकर मला हवा भरजरी ।" लोळण भूवरी । घेतली मी ॥५॥
आक्रोशही केला सेविले ना अन्न । भाऊराया खिन्न । मनामाजी ॥६॥
मातेच्या डोळ्यांत आसवे मोलाचीं । मोत्यांच्या तोलाचीं । ओघळलीं ॥७॥
उरी धरोनिया मज समजावी । मायेची थोरवी । अघटित ॥८॥

* * *

मी ही मोठी झालें, तू ही वाढलासी । संपन्न झालासी । भाऊराया ॥९॥
सुदिन हा आला सुखाचा सोहळा । नाही पहाण्याला । माय परी ! ॥१०॥
बैस भाऊराया ओवाळिते तूज । आज भाऊबीज । सोनियाची ॥११॥
ओवाळणी नको हिरेया मोत्यांची । हृदयीं प्रेमाची । ज्योति तेवो ॥१२॥

* * *

६.

## स्वप्न

मृदुलकान्ती मऊ केश रेशमाचे
पारदर्शकही पंख त्या 'परी'चे
सवें नेई मज अंगुली धरून
निरामयता मम भान ने हरून ॥१॥

पथीं पाहुनि ती स्वप्नभूमि धाले
सृष्टिसौंदर्यें स्तिमित खरी झाले
मेघखंडापरि वृक्ष ते प्रचंड
आम्र, पिंपळ, वट माजले कदंब ॥२॥

वृक्षराजीं लदबदुन फळें गेलीं
शोभवीती भरघोंस फुलें वेली
निळ्या सळसळती नागिणी नद्यांच्या
सुवर्णाच्या मालिका ह्या नगांच्या ॥ ३ ॥

रंगिबेरंगी थवे पाखरांचे
जलीं खुललें लावण्य उत्पलांचे
अहा ! समृद्धी येथ निसर्गाची
त्यांत परमावधि मानवी कलेची ॥४॥

लोक उद्योगी, शूर, स्वाभिमानी
इथे कोणाते शत्रू नसे कोणी
प्राण वेंचाया मायभूमिलागीं
सर्व तत्पर दिसतात सदा राजी ॥ ५ ॥

कलावन्तांची अतुल कला नामीं
हिरे-मोत्यें पिकविली कृषिवलांनी
वीर येथे हातात शस्त्र घेती
दुर्बलांना रक्षिण्या, दुष्ट घाती ॥ ६ ॥

बहुश्रुतता, विद्वत्व सज्जनांचे
मानवाच्या प्रगतीस वाहिलें तें
कारखाने धडधडत लाखलाख !
धूर सोन्याचा जातसे नभांस ! ! ॥ ७ ॥

' तिन्ही बाजूस झालरी सागराच्या
वरी दिसला ध्वज उंच हिमनगाचा '
स्वप्नभूमीच्या जागीं भारतास
पाहतांची ये ' जागृति ' मनांस ! ॥ ८ ॥

* * *

७.

# लोकमान्यांच्या स्मृतीस वंदन

‘ सिंहलग्न ’ लाभले जयांस शोभलें खरें
अंबरास भेदिले तसेंच गर्जना स्वरें

‘ केसरी ’च पत्रकास नांव सार्थ ज्या गमे
‘ सिंह ’ हिंदभूमिचा ठरे खरा पराक्रमें

मोहजाल टाकुनी प्रजेस त्यांत गोविलें
धूर्त ते ब्रिटीशभूप सार्वभौम जाहले

“ दास्य पंकीं या रुताल, रामराज्य हें नव्हे !
बोलला पुन्हा स्वराज्य स्थापुया गमावलें ! ”

खोवुनी कटीस खड्ग धारवान बुद्धिचें
ठाकला झुगारण्यास दास्य मायभूमिचें

जाहलो स्वतंत्र आज श्रेय सर्व त्यां खरें
हा असो प्रणाम आज तद्स्मृतीस आदरें

* * *

८.

## वसंतांतील पहाट

पहाटेची वेळा । जाग आली डोळा । कूजती कोकिळा । पंचमांत ॥ १ ॥
नभ हें प्रसन्न । पक्षी गाती गान । उंचावोनी मान । घरट्यांत ॥ २ ॥
चमकते दूर । चंद्रम्याची कोर । शुक्रासंगें नूर । दाखविते ॥ ३ ॥
सुगंध पसरी । वायूची लहर । आलासे बहर । मोगरींना ॥ ४ ॥
उमलता जळीं । कमळ पाकळी । बाहेरी हे अलि । उडतात ॥ ५ ॥
आंब्यावर आली । वसंताची लाली । पर्णे मखमली । डवरलीं ॥ ६ ॥
डोंगराच्या मागे । हसतो भास्कर । सुवर्णाचे कर । दाखवोनी ॥ ७ ॥
लाजली पहाट । कुठे झाली लुप्त ? नश्वर जगत । खरोखरी ॥ ८ ॥

१.

# पर्वतीवरील संध्याकाळ

वळलेल्या वाटेवरी शिरिषाचा अहा थाट
सडा हिरव्या फुलांचा, येई सुगंधाची लाट

ओढ्यावरी सान पूल जाऊं ओलांडून पुढें
कडूलिंब बहरला, विरे गंध चोहिंकडे

रम्य टेकडी समोर, चला जाऊं वर थेट
आहे कठिण चढण, हवा लावावया नेट

पिंपळाची सळसळ, संगे वारा घाली शीळ
आलों गडे माथ्यावरी, बसूं इथे जरा वेळ

पलीकडे लपलेली, झाडींतून दिसे वाट
वारा धांवतो मधेंच थंडगार नी सोसाट

पहा खालीं गावांकडे, दीप पाजळले सारे
वाटे भुईवर आले स्वर्ग सोडुनिया तारे

लुकलुकताति दिवे, फिटे डोळ्यांचे पारणें
जसे काजवे झाडींत ! की ही हिऱ्यांची तोरणें ?

शब्द एकच अहाहा ! भारावून जाई ऊर
गारगार वारा त्यांत मिळे सनईचा सूर

झडू लागला चौघडा ' सांब ' आणि ' माये 'पुढें
चला उतरूं पायऱ्या लांब जाणे घराकडे

कधिं येऊन ' पुण्याला ' असे पर्वतीला जाल
सदा मनीं घोटाळेल अशी रम्य संध्याकाळ

* * *

१०.

# पावसाळा

आला पावसाळा । मेघ झाले गोळा ।
जळ-मणि माळा । ओघळती ॥ १ ॥

करी गलबला । पाखरांचा मेळा ।
उमलती कळ्या । सुवासिक ॥ २ ॥

शांत झाल्या झळा । गोडी ये जांभळां ।
सुखाचा सोहळा । सृष्टिवरी ॥ ३ ॥

ऊत फुलां फळां । भिजे शेत-मळा ।
वृक्ष, लता, जाळ्या । तरारल्या ॥ ४ ॥

मोर नाचे निळा । सांगतो आभाळा ।
येणार सावळा । गोकुळांत ॥ ५ ॥

पूर येई जळा । नद्या सळसळा ।
ओहळ खळाळा । झेपावती ॥ ६ ॥

चिखल भूतळा । पंख ये मुंगीला ।
काळजी दयाळा । सकळांची ॥ ७ ॥

११.

# सूर्य गेला भारताचा—

लोकमान्य टिळकांचा पुण्यवान आत्मा ज्यावेळीं ह्या नश्वर देहाचा त्याग करून, पारतंत्र्याच्या बंधनांच्या पलीकडे गेला, त्यावेळीं ह्या अभागी भारतांतील एकूणएक हृदयांत असाच कल्लोळ माजला असेल का ?

* * *

सूर्य गेला भारताचा। चहूंकडे अता अंधार ॥ ध्रृ० ॥

नील नभीचा ध्रुव निखळला।
मार्ग ही ना सांपडे।

देश झाला पोरका हा—
कोणता दुजा आधार? ॥ १ ॥

वीर गेला, धीर गळला।
स्मृतिच केवळ यापुढें !

आठवूं ते रूप गंभीर—
चालवूं ते तत्त्व खंबीर।
घेऊं नच कधिं माघार ! ॥ २ ॥

* * *

१२.

# आई

बालपणी का चिमण्या जीवां टाकुन गेली आई
देवा देई अमुची आई ! रडलों धायीं धायीं
किती गाळले क्षणाक्षणाला, अश्रु तुजला स्मरुनि
माय माउली कधी न लाभे जगांत कोणा फिरुनि !

✤ ✤ ✤

एकटीच माउली जाणते ' बाळां–मनिंची ' आंस
आई वाचुन कोण काढुनी देई मुखिंचा घांस
विशुद्ध निर्मल ठावे आहे प्रेम तिचें सर्वांस
आई नसता सीमा नाहीं जगतीं दुर्दैवांस !

✤ ✤ ✤

फाडफाडुनी डोळे, तुमचे दुर्गूण जग पाहील
आई वाचुन चीज गुणांचे कसें कुठें होईल ?
व्यर्थ जिणें हे माते तुजविण, होते म्हणुनी कष्टी
परी अचानक आज लाभली मजला नूतन दृष्टि !

✤ ✤ ✤

मातृसुखाला आंचवलेली बाळे गोजिरवाणी
जिथे जिथे मज दिसती, दृष्टि लावुन केविलवाणी
प्रेमामृत मी सिंचन करुनी फुलविन तीं मधु सुमनें
मुक्त करीन ' जग–ग्रिष्मापासुन ' गाऊनि श्रावणगाणें

✤ ✤ ✤

१३.

## आहे आम्हांपाशीं मनोबळ

परिस्थितीवरी केली आम्हीं मात । करूं आनंदांत । दिपवाळी ॥१॥

महागाई जरी करिते बेजार । खुला हो बाजार । ‘आनंदाचा’ ॥२॥

चिन्ता नरकासूर, वधू निग्रहानें । समाधान स्नानें । शुद्ध होऊं ॥३॥

मोह महा-बळि । घालुया पाताळी । आपोआप कलि । नाश पावे ॥४॥

नको आम्हां चैन । नको ते विलास । आली हो मनास । निरिच्छता ॥५॥

सद्‌गुणांचे तेल । तेवते पणती । दिव्य तीत ज्योति । मानवता ॥६॥

प्रेमें पूजा बांधा । गृह लक्ष्मीची । श्रीमंती मनाची । तिचे ठायीं ॥७॥

भाऊ राखतील । बहिणींची लाज । हीच भाऊबीज । बहुमोल ॥८॥

द्वैताचे ते जाळू । फटाके दाराशीं । मग हो सुखाशी । तोड नाहीं ॥९॥

हिरागारगोटी । आम्हांते सारखी । आम्हांहुन सुखी । कोण बरें ? ॥१०॥

साजरी कराया । दिपवाळी ऐशी । आहे आम्हांपाशी । मनोबळ ॥११॥

* * *

१४.

## बैलोबाचें मागणें

(राजकवि यशवंत यांची क्षमा मागून)

देवा दयाळा श्रीहरी । वानूं किती कैसें तरी ।
केलेस बैलोबा जरी । मी धन्य झालो भूवरी ॥१॥

आम्हां न बुद्धी त्वां दिली । केले सुखी या भूतलीं ।
ती मानवाते अर्पिली । गेली तयाच्या रे शिरीं ॥२॥

जाऊन माथे फिरविलें । त्या भावनांना हराविलें ।
आणि दये भिर्काविले । होती तयाच्या जी उरीं ॥३॥

अम्हां परी जन वर्तती । बुद्धी तयांची सारथी ।
देईल जैसी ती गती । धांवे तसा मार्गावरी ॥४॥

तू जाण 'मानव' 'जात' की । अन् 'धर्म' तो 'माणुसकी' ।
बुद्धी तुझी पडली फिकी । या मानवा पुढती खरी ॥५॥

या धर्म, जाती हो भल्या । लक्षावधीनें निर्मिल्या ।
शत्रू परी सरसावल्या । खुपसायला अन्या उरीं ॥६॥

हें बुद्धीवैभव पाजळे । जें शोध लावी आगळे ।
अणूगोल, तोफा नाकळे । हत्या कशाला आसुरी ॥७॥

हे बैल शिंगावांचुनी ! आम्हीं बरें की त्याहुनी
येतील हो संरक्षणिं । शिंगेंच कामीं हीं खरीं ॥८॥

देवा तुला ही मागणी । देवत्व नंदीलागुनी ।
येईन नंदी होऊनी । जन्मा पुन्हा या भूवरी ॥९॥

दे कोणत्याही शासना । सोशीन साऱ्या यातना
ती साहवेना कल्पना । येईन जन्मा मानवीं ॥१०॥

१५.

## कैकयीस प्रभू रामचंद्राचें वंदन !

प्रणाम मम हा तुला प्रथम घे ! अये कैकयी
तुवांच मज मङ्गले ! दिधली कीर्ति लोकत्रयीं
दयाच जणूं मूर्तिमंत जननी ! वना धाडुनी ।
" धनू-कुशलता " मलाच मम त्वा दिली दावुनी

असो नमन माउली ! दशमुखा वधोनी बळें
जना सुखविलें अहा तव कृपाप्रासादामुळें !
जगीं जननी धन्य तू म्हणुनि वंदितो गे तुला !
अहा ! भरतबंधूभाव जगता तुवां दाविला
पिता वचन पाळिता-रघुकुळा चढें भूषण
कळे-अतुल पुत्रप्रेम करी प्राणही अर्पण "
तुवांच मज कैकये मिळवुनी दिला भक्त हा
सखा सुहृद मारुती-परम शक्तिशाली महा
अहा अतुल त्यागशील दिसला जगा लक्ष्मण
तशी सगुण उर्मिला ! म्हणून हे तुला वंदन
सती करूनि दिव्य ते प्रगटली सखी जानकी
असो तव कृपा अशीच ! नच मागणे आन की !

१६.

## किती क्षुद्र मी ! विश्वापुढती अफाट ! !

चुकुनी आले वाट वनिया, चुकुनी आले वाट ! ॥ धृ. ॥

गांव राहिला कुठे नाकळे
चालुन शिणले, जीव व्याकुळें
बघुनि सभोंती मन बावरले
राई ही घनदाट ! चुकुनी आले वाट ॥१॥

कृष्ण मेघ भयकारी जमले
धूसरता ही हवेंत मिसळे
अवसानही मम गाळी सगळे
वारा हा सोसाट ! चुकुनी आले वाट ॥२॥

मी एकाकी कुणि न संगती
निर्जनतेची इथली शांति
लागेलच ना थांग कुणाप्रति
विश्वाच्या फेऱ्यांत ! चुकुनी आले वाट ॥३॥

उभा पुढें हा कडा राक्षसी
जाणिव झाली खरी मनासी
किती क्षुद्र मी ! गर्व कशासी ?
विश्वापुढति अफाट ! चुकुनी आले वाट ॥ ४ ॥

* * *

१७.

## सावळ्या बाळाची समजूत

वाटणीला आला। रंग रे सावळा । म्हणुनी का बाळा । कष्टी होसी ?॥१॥

रंगरूप राजा । देवाधिन गोष्टी । पराक्रम हाती । मानवाच्या ॥२॥

बाह्यरंग खोटा । असे सारे ढोंग । पाहे अंतरंग । खरा ज्ञानी ॥३॥

विश्वाच्या हृदयीं । प्रेमें सामावलें । होते ते सावळे । रामकृष्ण ॥४॥

'दिल्लीशा' ला पाणी। पाजियले बळें। होते ना सावळे। शिवबा ते ? ॥५॥

काळी रे कोकीळा । गोरा अन् बगळा। आवडते तुला । कोण बरें ?॥६॥

हांस बघू आता । पूस गोड डोळे । फुल्लूं दे सावळे । वदन हे ॥७॥

१८.

# राम घरीं यायचे

[ खरोखरीच ज्यावेळीं श्रीराम, वनवासांतून घरीं आले, त्यावेळीं अयोध्येच्या लोकांची अशीच मनस्थिति झाली असेल का ? ]

* * *

सर्वजण एकदमः—

राम मनिं ध्यायचे, नाम मुखिं गायचे ।
सावळे राम अजि, घरीं पुन्हां यायचे ॥ ध्रु० ॥

पुरुषः—

वाजवा दुंदुभी, गजर जावो नभीं ।
राज्य रामा खरें आज तव व्हायचे ॥ १ ॥

सूर्य-चंद्रापरी शीतता, स्वीकरी ।
क्षण ही जल का बरें थांबले वहायचे ? ॥ २ ॥

स्त्रियाः—

चंदनाचे सडे शिंपुया की गडे ।
आवरूं लगबगा स्वागता जायचे ॥ ३ ॥

सेवुनीया मुळे रामप्रभू भागले ।
घालुया गोड त्या बहुविधा खायचे ॥ ४ ॥

मुलें:—

नाचुया गाऊया, रामप्रभु पाहूया ।
अंजनीसूत हो त्यांसवें यायचे ॥ ५ ॥

आज मारू उड्या, उंच नेऊं गुढ्या ।
राम येता असे भान हरपायचे ॥ ६ ॥

⚘ ⚘ ⚘

सर्वजण:—

राम मनिं ध्यायचे, राम मुखिं गायचे
सावळे राम ते आज घरीं यायचे ॥धृ०॥

⚘ ⚘ ⚘

भाग २ रा

# महिलांसाठीं

क्रमांक ........................ नों: दि: ..............

१९.

# मुलीकडची विहीण

शान्त मनें घेई गडे उपहारा या वेला    ॥ ध्रृ० ॥
" आजवरी वाढविले प्रेमभरें मज ज्यांनीं
सोडुनि त्या जाऊं कशी ? बावरले बहुत मनीं "
आणू नको मुळीहि मनी, परी ऐशा शंकेला ।
शांत मनें.... ॥ १ ॥

आनंदे राहुनिया गृहकृत्यें करी नेमें
वडिलांते प्रिय होई वागुनिया तूं प्रेमें
राहुनि तत्पर कार्यीं तोषवि तू सकलांला ।
शांत मनें.... ॥ २ ॥

साधूंनी गायियली स्तुतिस्तोत्रें जगीं ज्याची
हृदयीं असो सतत तुझ्या मूर्ति त्या श्रीहरीची
विसरू नको त्याते जो हितकारी जगताला ।
शांत मनें.... ॥ ३ ॥

सद्गुणि सासूबाई बहू प्रेमळ त्याचपरी
कन्येसम मानुनि तुज करतिल सांभाळ जरी
वेडी परि माया ही बोलविते ह्या बोला
" अर्पियली, प्रेमभरें सांभाळा ही बाला " ।
शांत मनें.... ॥ ४ ॥

२०.

# मुलाकडची विहीण

[ गज्जल ]

दुःख आता आवरावे कठिण ही वेला जरी
ना सहे हा विरह कैसा कल्पना आम्हां खरी ॥ धृ० ॥

मेनका कन्या निघे जै सासरी जाण्यास तेव्हां
वन थरारे दुःखभारें, वाहिल्या अश्रूसरी । दुःख आता....॥ १ ॥

विनयशाली कन्यका ही, गोडवा ही वर्तनी
पाहुनी वात्सल्य तैसे प्रेम दाटे अंतरी । दुःख आता.... ॥ २ ॥

कौतुकानें कोड पुरवूं, तिळही नाही जाच गेहीं
घेऊं सांभाळून चुकल्या–मानुनी कन्येपरी । दुःख आता...॥ ३ ॥

* * *

२१.

## माहेराचं तिळवण

रथ फिरला माघारी । दक्षिणेचा सरे भाव ।
चालले हो सूर्यदेव । उत्तरेसी ॥ १ ॥

आज संक्रांतीचा सण । हरखलें सारेजण ।
माहेराचं तिळवणं । लेकीबाईच्या ॥ २ ॥

मानाचा गजराज । आला झुलत घेवोनी ।
पाठीवर भरल्या गोणी । कुंकवाच्या ॥ ३ ॥

संक्रान्त मोठा सण । स्वीकारा काळा खण ।
आपुला पहिला मान । विहीणीबाई ॥ ४ ॥

लेक अर्पिली आपणा । दोष घालावे पोटांत ।
तीळ झाकावे पाकांत । साखरेच्या ॥ ५ ॥

भाग्याची लेक माझी । मिळाले थोर पती ।
जसे सीता-रघुपती । शोभतात ॥ ६ ॥

सासराची चंद्रकळा । माहेराचे अलंकार ।
हौसेला नाहीं मोल । दोन्हीं कुळीं ॥ ७ ॥

नये दुखवूं कोणाला । शिकवण ही तिळाची ।
मनें राखावी सर्वांची । लेकीबाई ॥ ८ ॥

राग वडील जनांचा । जसा काटा हलव्याचा ।
नाहीं मुळी बोचायाचा । गोड अंती ॥ ९ ॥

तिळगूळ अमुचा घ्यावा । तिळगूळ अपुला द्यावा ।
लोभ असाच रहावा । दोन्हीं कुळीं ॥ १० ॥

* * *

२२.

## डोहाळे झोपाळ्यावरचे

[ **चाल**—ही नार रूपसुंदरी ]

संकोच भीड तशी लाज । सोडुनी आज । सांग जे होतीं
दोहद उल्हासे झटुनी पुरविती युवती ॥ १ ॥

वायुनें झुला हा जुले । गंध परिमले । दोर करकरती
माकंदपत्र तोरणे कशी थरथरती ॥ २ ॥

सुमनांचे मोहक हार । तशा सुकुमार । लता सोडोनी
वाटते बैसली उद्यानीं वनराणी ॥ ३ ॥

ठळकशी कोर कुंकवाची । बिंदी पुष्पाची । लटकती गेंद
हातासी शोभती छंद, बाजुबंद ॥ ४ ॥

चाल बदलून:—

केतकीचीं पर्णें वेणीमधें खोचुन ।
वाटतसे ही जणूं शंभूची भिल्लीण ।
की गमे शारदा घेई आंदोलन ।

चाल पहिली:—

विष्णूची पत्नी ती रमा । भासते अम्हां । आली भूवरती ।
दोहद उल्हासे झटुनि पुरविती युवती ॥ ५ ॥

चाल बदलून:—

होऊं दे पुत्र तुजलागी गे सद्गुणि
तेजानें भासो जैसा वासरमणी
शौर्यानें गाजो रामचंद्र हा रणीं

चाल पहिली:—

विद्वान् बाळ टिळकसा । शिवाजी जसा । धोरणी शूर
स्वातंत्र्य टिकवुनि करो देश उद्धार ॥ ६ ॥

२३.

## डोहाळे उपवनांतले

(चाल—कार्तिक पौर्णिमा रम्य निशा समयाला-)

जानकीस पुसती प्रेमें या ऋषिबाला
डोहाळे सांगे सखये झणि या काला । धृ. ॥

या रम्य उपवनीं साऱ्या: मिळुनी मोदें
भव दुःख क्षणभरी विसरूं या आनंदें
हा वृक्षांवरती पहा लतांचा झोला
आंदोळूं त्यावर जाऊं उंच नभाला

(चाल बदलून—)

हे वृक्ष कसे फलभारे वाकले ।
नाजूक लतांनीं ज्यांना वेढिलें ।
हा फुलुनी हिरवा चाफा परिमलें ।

(चाल पहिली—)

हे हिरवे राघू बोलति मंजुळ बोला ।
डोहाळे सांगे सखये झणि या काला ॥ १ ॥

ही हिरवी वस्त्रें स्पर्शुनि तव कायेला
पावित्र्य पावली ये सौंदर्य तयाला
हीं हिरवीं, हिरवीं, करीं कंकणें खुललीं
तव करकमलांनी दलेंच हीं भूषविलीं

( चाल बदलून )

कर्दली पर्ण ही येथें मांडिले
अंजीर जांब ही ताजे आणिले ।
घड द्राक्षांचे तुजसाठी तोडिले ।

चाल पहिली:—

या प्रेमें सेवी वनिंच्या अल्प आहारा
डोहाळे सांगे सखये झणिं या काला ॥ २ ॥

साक्षात लाभली आदिमाय ज्या माता
तो पिता ब्रह्म की त्रैलोकाचा त्राता
हा पुण्यवान हो कोण? काय तप केले?
की भाग्य तयाचे आज फळाला आलें!

चाल बदलून:—

हें होईल उपवन तेव्हां पावन ।
तो महाभाग जैं जन्मा येऊन ।
दीपवील प्रतापें सारे भूजन ।

चाल पहिली:—

बहु अधीर झालों पहावयास तव बाळा
डोहाळे सांगे सखये झणि या काला ॥ ३ ॥

* * *

## २४.

## डोहाळे चांदण्यांतले

तव डोहाळे प्रेमें पुरवायाला । आनंदे जमल्या महिला ॥धृ०॥

आल्हाद मना देई मंगल वेला । चंद्रिका सुखद जगताला
हा पुनवेचा चांद नील अस्मानीं । खुलली त्या बघुनी अवनी
ओसंडे अमृत कुठुनी ?
कुणि रत्नें उधळी गगनीं ?
पाझरे दिव्यता वरुनी !
सौंदर्य गडे दिसते हें नयनाला । परि ये ना वर्णायाला
तव डोहाळे प्रेमें पुरवायाला । आनंदें जमल्या महिला ॥ १ ॥

* * *

परिधान सखे शालु धवल तू केला । तव कान्तीला जो खुलला
ल्यालीस तशा सुंदर मौक्तिकमाला । ये शोभा तव वदनाला
ही जाईची खुलली वेणी धवला । लाजवीन निशिगंधाला
हें रौप्यताट तव पुढती
रंगावलि शुभ्रच भवती
पक्वान्नें धवलचि खुलती
वद काय तुला हवे गमे या काला । आनंदे जमल्या महिला ॥ २ ॥

* * *

रमणीय अहा निष्कलंक ही वेला । अनुसरें जणु तव शीला
मज वाटे की तवरूपे अवतरली । शारदा इथे शुभकाली
तें तेज सखे तव वदनावर आलें । जें भविष्यवाणी बोले
शीलवान होइल बाळ ।
बुद्धी त्या घालिल माळ ।
मधु आचरणे सुखवील ।
निज मातेला, तेविं सखे जगताला । आनंदे जमल्या महिल्या ॥ ३ ॥

* * *

२५.

## डोहाळे कोवळ्या उन्हांतले

डोहाळे तव पुरविन वहिनी । आज शुभदिनी जमुनि मैत्रिणी ॥धृ.॥

रास रुप्याची उधळे भास्कर
नभांस ये शोभा ही सुंदर
रत्नमयीं ही गमे मेदिनी । पुरविन वहिनी... डोहाळे तव ॥ १ ॥

बालरवि वर हंसतो अंबरीं
जादुगार की हा रंगारी
पंचरंग झणि दावी उधळुनि । पुरविन वहिनी....डोहाळे तव ॥ २ ॥

चमचमती जललहरी किरणी
अलि बाहेरी ये कमलातुनि
गुंग पांखरें किलबिल गानीं । पुरविन वहिनी...डोहाळे तव ॥ ३ ॥

पारिजातक, मदनबाण हा
मधूमालती, गंध मधुर हा
बकुल, सुरंगीं, फुलली बकानी । पुरविन वहिनी....डोहाळे तव॥४॥

माणिक मोती पांच जवाहिर
अलंकार रंगीत मनोहर
फिरत्यारंगी खुलें पैठणी । पुरविन वहिनी.... डोहाळे तव ॥ ५ ॥

प्रभात कालीं दूध शर्करा
घेई सखे अल्पही उपहारा
सुत होवो साक्षात दिनमणी । पुरविन वहिनी....डोहाळे तव ॥ ६ ॥

✤ ✤ ✤

२६.

## डोहाळे जेवणाचे

( चाल—घुमव घुमव एकदां फिरून तो गोड तुझा पावा )

भीड सखे ही कुठवर सांगे डोहाळे मोदे ।
प्रेमें आम्हीं जमलो येथे पुरवूं आनंदें ॥ धृ० ॥

पुष्पहार सोडुनी सजविला मंडप हा सारा
सोहाळा हा तुझियासाठीं सखये निर्मीला

( चाल बदलून )—
या पंक्ति शोभल्या, सुममाला ओविल्या
संमेलन भासे रंगांचे हे मला
सम्राट शालु नव रंगांचा शोभला

( चाल पहिली )—
दरवळला हा मंडप सारा, सखये सौगंधें। प्रेमें आम्हीं....॥१॥

केळीचीही पानें हिरवी ढवळी रांगोळी
लाल गुलाले रंगत्रायि ध्वजमाला ही खुलली
केल्या भाज्या चटण्या तैशा कोशिंबिरी नाना
जिलबी, चिरोटे, लाडु करंज्या खीरपुरी फेण्या
वैभव सारें पाहुनि तुजला, मोद न हो कांहीं
भोग अम्हांला हवे कासया ? वाटे का बाई !

( चाल बदलून )

दे प्रभो पुत्र हिज हो भूषण जो कुळा ।
नेईल स्वदेशा वैभव यश मंदिरां
शोभेल भक्त जो भूमातेला खरा
दुमदुमुनी ही जाईल धरणी, 'जय जय जय' नादें । प्रेमें आम्हीं ...॥२॥

२७.

# डोहाळे गमतीचे

पहिले मासीं सासू की पुसे
सूनबाई तुमचे डोहाळे कैसे ?
" वाटे बाई घ्यावा शीत मँगोला
सासूबाई द्याहो भरूनी पेला. "

दुसरे मासीं सासरा पुसे
सूनबाई तुमचे डोहाळे कैसे ?
" यात्रा कंपनींत नांव हो घाला
सासूबाईसंगे जा हो काशीला ! "

तिसरे मासीं नणंद पुसे
वहिनी वहिनी तुमचे डोहाळे कैसे ?
" जमवा एकदां वन्सं लग्न त्वरित
नका होऊ बाई अशा चकीत. "

चवथे मासीं दीर की पुसे
वहिनी तुमचे डोहाळे कैसे ?
" पेशवे उद्यानीं खाऊया भेळ
' जीवन ' मध्यें वा दहीमिसळ "

पाचवे मासीं जाऊ की पुसे
बाई बाई तुमचे डोहाळे कैसे ?
" जाऊ बाई तुम्हीं काम करावें
वाटे मला आपण बसून खावे "

सहावे मासीं पती की पुसे
सांग गे लाडके डोहाळे कैसे ?
" चार दीस जाऊं दोघेच दूरी
माथेरान किंवा महाबळेश्वरीं "

✤ ✤ ✤

सातवे मासीं बहीण पुसे
सांग ताई तुझे डोहाळे कैसे ?
" लाडक्या आलो ग माहेरवाशिणी
खाऊं, पिऊं हसूं गाऊंया गाणीं "

आठवे मासीं पिता की पुसे
सांग बाळे तुझे डोहाळे कैसे ?
" बाबा, हवा नवा घोडी पाळणा
प्लॅस्टीकची छानशीं खेळणीं आणा. "

नववे मासीं आई की पुसे
सांग बाळे तुझे डोहाळे कैसे ?

" खोली साफसूफ कर तय्यार
जुन्याकाळा परी नको अंधार ! "

* * *

दहावे मासीं झालें बारसें
सगळ्यांना झालें कसें हायसे !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
99234

२८.

## पाळणा ( मुलाचा )

बाळा जो जो रे सुकुमारा। निद्रा करी लडिवाळा ॥ धृ० ॥

दौलत लाखाची तू अमुची। नको हिरेमोत्यांची बाळा जो जो रे॥ १ ॥

मोदाचा झोला, बांधीला। सुखशय्याही तुजला।
ठेवा सौख्याचा तू बाळा। प्रेम पांघरूण शेला। बाळा जो जो रे॥ २ ॥

बुद्धीचे पाणी तव नयनीं। निश्चय दावी जिवणी।
रूपा पाहोनी तोष मनीं। कान्ति तव कांचनी। बाळा जो जो रे॥ ३ ॥

उत्साही रमणी, ह्या जमुनी। गाती मंजुळ गाणी
आनंदें रमली, तव जननीं। मोद न माये गगनीं। बाळा जो जो रे ॥४॥

नांव ठेवियले तव कानीं। हंससी जे ऐकोनी।
त्या नामें अवनीं गाजवुनी। धन्य करी तव जननी। बाळा जो जो रे॥५॥

* * *

२९.

## पाळणा मुलीचा

हा झुले झुला वाजती घुंगुरवाळे ।
जो जो ग जो जो बाळे ॥ धृ. ॥

तू चंद्रकला संसाराच्या गगनीं ।
आनंदखनी तू सदनी ।
हे लक्ष्मीचे बालरूप अवतरले ।
धन मुठींत आहे लपले ।

(चाल बदलून)—हें जावळ कुरळे कुरळे
हे नेत्र निळी जणू कमळे
निर्व्याज हास्य मुखीं उमले
तव रूपानें मोद गृहीं ह्या खेळे ।
जो जो ग जो जो बाळे ॥ १ ॥

ह्या सर्वजणी जमल्या ताई माई
गातात तुला अंगाई
ल्यायास पहा परोपरी तुजसाठी
आणिती गोडशा भेटी ।

( चाल बदलून )—बहू सुलक्षणी ही बाला
उद्धरील हो स्वकुलाला
हो भूषण निज देशाला
हा आमुचा घे आशिस् तुजला बाळे
जो जो ग जो जो बाळे ॥ २ ॥

* * *

दि:
क्रमांक नों: दि:

३०.

# अंगाई गीत

पाळणा सोन्याचा । खेळणं मोत्याचं ।
बाळ लाडकं आईचं । जो जो करी ॥ १ ॥

संसाराच्या आकाशांत । बाळ शोभे चांदतारा
देई आल्हाद अंतरा । माऊलीच्या ॥ २ ॥

बाळा तुझ्या हंसण्यानें । घरं गेलं निनादून ।
तुला पाहिल्या वाचून । चैन नाही ॥ ३ ॥

बाळा तुझ्या रांगण्याला पुरणार नाही घर ।
तसं आंगण अपुरं । खेळायला ॥ ४ ॥

चाल चाल करशिल । तुझी नाजुक पाउलं ।
जशी गुलाबाची फुलं । उमललीं ॥ ५ ॥

पाया रुततील खडे । दुडुदुडु धावताना ।
फुलें पसरूं चिमण्या । वाटे माजी ॥ ६ ॥

तुझी कान्ती सुवर्णाचीं । तुझे डोळे नीलमणी
दांत हिऱ्यांचे, कोंदणी । माणिकांच्या ॥ ७ ॥

वडिलांच्या बागे मधे । तोटा नाही फुलांफळां ।
नेऊनियां बालमेळा । मौज करी ॥ ८ ॥

तुझ्या आजोबांची कीर्ति । वडिलांनीं वाढविली ।
परंपरा चालविली । घराण्याची ॥ ९ ॥

घराण्याचें नांव राख । बाळा होई औक्षवंत ।
कीर्ति जाऊंदे दिगंत । एक आस ॥१०॥

३१.

## दौलत

दौलत माझी लाखाची
गोंडस मूर्ति बाळाची
मुसमुसत्या आरोग्याची
शोभा माझ्या सदनाची ॥ १ ॥

गौर तनु मम तान्ह्याची
रास गमे मज सोन्याची
निळ्या पारव्या डोळ्यांची
प्रभा भासते रत्नांची ॥ २ ॥

अधरीं माणिक पवळ्यांची
माळ गुंफिली कुणि साची
उडालि त्रेधा मोत्यांची
रदनावलि पाहुनि याची ॥ ३ ॥

हास्याच्या मधुमधु लहरी
निनादते लक्ष्मीच घरीं
सांभाळावी जन्मभरी
हीच प्रार्थना तुम्हां हरी ॥ ४ ॥

* * *

३२.

## खोडकर बाळास

गोडपणा खेळे गालीं, हसूं निर्व्याज ओठीं ते ।
निष्पाप ह्या डोळ्यातुनि मिष्कीलता ओसंडते ।

किती करशील खोडया क्षणाक्षणाला नवीन
तुझ्या खोडयाळपणानें घर गेलं भंडावून ।

सकलांच्या कामामाजीं लुडबुड तुझी सदा
गोड गोड बडबड उडविसी त्रेधात्रेधा ।

तुझ्या कागाळ्या आणीती बाळा रोज शेजारीणी
धंदा नाहीं दुजा त्याना ! बाळ माझा बहू गुणी॰

३ ३.

## मातृभोजन

मातृभोजनाचा केला बहु थाट । चंदनाचे पाट ठेवियले ॥ १ ॥

ताटें हीं रुप्याचीं रांगोळी सभोतीं । सोनियाच्या ज्योति । समईत ॥ २ ॥

तोरणे झुंबरे मंडपी शोभतीं । केळी ह्या डोलती । दारीं तुझ्या ॥ ३ ॥

गोड घांस बाळा मायें भरविले । अमृत लाजले । तयापुढे ॥ ४ ॥

हीच वेळ बाळा क्षण हे सुखाचे । घोट अमृताचे । सेवी मोदे ॥ ५ ॥

आज पासुनियां बाल्य हरपले । कर्तव्य ते ठेलें । तुझ्या पुढें ॥ ६ ॥

कार्य करण्याला । ध्येय साधायाला । दीर्घायुष्य बाळा । देई प्रभो ॥७॥

३४.

## मंगलाष्टकें

गौरीनंदन वंदुया प्रथम जो तेजें रवि की दुजा
विघ्नाते हरण्यास तत्पर असे, विघ्नेश तो सर्वदा
करवीराहुनि येऊंदे शुभदिनी अंबा महामङ्गला
देवो आशिस् आज या वधुवरा, कुर्यात् सदा मङ्गलम्

* * *

शोभे मंडप भव्यसा खुलविती हंड्या, छता झुंबरें
केळी दाट पुढें, पवित्र गमती ही आम्रपर्णे बरें
मांगल्यासह मूर्तिमंत शुचिता चालून आली घरा
संतोषें वसते अशा स्थलिं रमा, कुर्यात् सदा मंगलम्

* * *

निष्ठा ठेवुनि आचरा उभयता श्रीरामसीतेपरी
व्हावे जीवन एकरूप यमुनागंगा जशा संगमीं
व्हावे पूरकही तसे उभयता सूर्या जसा चंद्रमा
ऐसे प्रेमळ साहचर्य मिळता सौख्या न सीमा तुम्हां

* * *

संसारीं नच दंग व्हा विसरुनी या भारताला परी
स्वार्था सोडुनि अल्पस्वल्प करणे अन्यार्थ कांहींतरी

सौजन्यें निज लाघवे जगतीं व्हा आदर्श पत्नीपती
ईशाते विसरू नका विनवुत्या, कुर्यात् सदा मंगलम्

✤ ✤ ✤

वाढो वंशलता अशी, रविशशी येती नभा जोवरीं
नारी शीलवती तसे नरमणि गाजोंत या भूवरी
होवो वंश ‘ रघू यदू ’ सम खरा सन्मान्य त्रैलोकीं या
समृद्धी यश लाभूदे प्रभु तया कुर्यात सदा मंगलम्

✤ ✤ ✤

# भाग ३ रा

# मौजेसाठीं

३५.

## बल्लवाचार्य

पै–पाहुणे फार यायचे घरीं मजेकरिता
आचारी ही म्हणुनी योजिला ‘मे’ महिन्यापुरता
जेवुनखावुन पगार ठरला पंचेचाळीस
निम्मा आधी द्यायाचा हो ‘ॲड्व्हान्स’ही त्यांस !

चहा तयानें येता जाता घ्यावा मनसोक्त
कुणी न बोलायाचे त्यासी मीठ कमिजास्त !
ठरले सगळे, पहिल्या दिवशीं ड्युटीवर आला
झटपट अगदी काम, तयाचा होत बोलबाला !

दुसरा दिन तो गाळुन, तिसरे दिवशीं तो उगवे
चवथे दिवशीं बेपत्ता तो ! घरवाली कावे
पुन्हा प्रगटला पाचवे दिनी ! खडसावुनि त्यांस
पृच्छा करिता उत्तरला तो आचारी ‘ती’ स

“थंडि येते वाजुन मजला एकादिसा आड
थंडच पडली ऐकुनि त्याचें उत्तर बिनतोड !

३६.

## निशा–स्वप्न !

[ उषास्वप्नकार—श्री. ग. दि. माडगूळकर यांची क्षमा मागून ]

हळुच कुणि आला ग ' चोर ' मंदिरीं
झोपेतच होते मी मंचकावरी ॥ धृ. ॥

गुंडोचित चाल धुंद! विकट सखे हास्य तें
टोंचियलें पिस्तुल तें अजुनि मला भासतें
धीटपणें वदला तो, " किल्ल्या दे सत्वरी "
झोपेतच होते मी मंचकावरी ॥ १ ॥

' सेफ ' झणि होय ' खुलीं ' सर्व क्षणीं संपलें ।
टेकुन शिर हातावर माझ्या मी बैसले
कळलि सखे नाही कधीं सरली ग शर्वरी
झोपेविण अजुनी मी मंचकावरी ॥ २ ॥

३७.

## सासर–माहेर !

ती :

किती झाले तरी गडे सासर ते हो सासर!
येईल का कधीं तया सांगा माहेराची सर?
माहेराचा ' राघू ' माझा डाळिंबाचे दाणे खाई
सासरच्या ' पोपट्याला ' ' मिरची ' ची गोडी बाई!

माहेराची म्हैस देई दूध हंडा–हंडा भर
सासरची मारकुटी गाय धावे अंगावर!
माहेराचा 'मोत्या' माझा कित्ती कित्ती हो इमानी
लोणी खातसे चोरूनि सासरची बया 'मनी'!

माहेराच्या चंद्रम्याच्या हिऱ्यामोतियांच्या कडा
सासरींचा चंद्र सदा उगवतो हो वाकडा!
माहेराचा वारा कसा वाहतसे झुळुकांनी
सासरच्या वावटळी धूळ घालीती लोचनीं!

माहेराच्या वाटे देती मोहरले वृक्ष छाया
सासरींच्या वाटेवरी भिवविती पडछाया!
कित्ती झाले तरी गडे सासर ते ना सासर!
येईल का कधी तया सांगा माहेराची सर?

तो :

बरोब्बर बोललीस म्हणुनी न होई धीर!
तुझ्या माहेरी जाण्याचा! सखे माझे ते सासर!!

३८.

## मलाच ते ठाऊक !

ती :

शामल कान्ती मम ही म्हणसी सतेज तुजला भासे
टरक्या नेत्रीं बुद्धीचेंही पाणी तुजला गवसे
आरोग्याची मूस गमें तुज जाडजूड मम काया
घंटारव मम ऐकुनि डुलसी नागावाणी राया
'हिडिंबा'च मी गमते लोका, परी उर्वशी तुजला!
काय अशी मम ठायीं जादू भुलवी नकळे तुजला!!

तो :

सखे लाडके, श्रीमंताची एकुलती तू लेक
कशी घालिसी सदा मोहिनी मलाच ते ठाऊक!!

३९.

## व्यापाऱ्यांचें गाणें

व्यापारी अम्हीं व्यापारी
बडे हिंदचे व्यापारी
देशाला झालों भारी
विश्वाला होऊं भारी! ॥ १ ॥

बनवूं अमुच्या भावाला
बनवूं अमुच्या देवांला
सत्य न अमुच्या गावांला
दानत कुठुनी नांवाला! ॥ २ ॥

जीवन हे पैशांसाठीं
'मूर्खांचे देशासाठीं'
पैशाच्या कमवूं राशी
कैक मार्ग अम्हांपाशीं! ॥ ३ ॥

* * *

४०.

# नवकारकुनाची नव रामरक्षा

धाव रामा दयाघना । ऐक दीनाची प्रार्थना ।
केविलवाण्या कारकुना । पाव आता ॥ १ ॥

तू जानकी यजमान । ' स्त्री हट्ट ' ठावा तुजला छान ।
देई मजला संरक्षण । पत्नी पासुनि ! ॥ २ ॥

रामा विनवितो हात जोडून । काननीं केलेसी यज्ञरक्षण ।
आता मजला देई शिक्षण । खिसा माझा रक्षावया ॥ ३ ॥

हपिसांत लेडी टायपिस्ट । लाली लावी ओठां नखां !
तुवां दंडिली शूर्पणखा । तारी मज ! ॥ ४ ॥

उन्मत्त होता रावण । तया दाविलासी रामबाण ।
साहेबापुढें शूरपण । देई माते ॥ ५ ॥

कपिसेना त्वां सांभाळिली । थोडी ' एफिशिअन्सी ' माझ्यांत घाली
दौत, लेखणी, फाईली । पोरांपासून रक्षावया ॥ ६ ॥

परिटांचा तू कैवारी । म्हणुनी बा ते चढले भारी ।
वाचव अमुच्या शर्ट विजारी । तूंच आतां ॥ ७ ॥

पार केलांत सागर । रामा तुम्हां काय दुस्तर ?
ओझ्याचा मी झालो 'खर'। घरीं दारीं सारखा ! ॥ ८ ॥

चोहोंकडून गांजलो । त्यांत 'नवकाव्याचा विषय' झालो ।
वाचव ! नातरी चाललों । वनवासाला कायमच्या ! ॥ ९ ॥

४१.

## आधुनिक सावित्री

जन्मोजन्मी द्यावा, हाच मज पती।
मागते ही सती। चुडेदान ॥ १ ॥

पुढलिया जन्मी, हवे हेच पती ।
परि दे आवृत्ती । सुधारून ॥ २ ॥

मित्रांच्या पत्नींच्या, स्वैपाकाची स्तुति ।
माझ्यांत काढिती। दोष सदा ॥ ३ ॥

पुढलिया जन्मीं, दोष हा नसावा।
माझ्यांत दिसावा। स्वर्ग त्यांना ॥ ४ ॥

सुट्टीच्या दिवशीं, मित्र जमविती ।
पत्ते अन् कुटिती। आरडोनी ! ॥ ५ ॥

पुढालिया जन्मीं, बुद्धी ह्यांना देई ।
घराची 'सफाई' । करावया ॥ ६ ॥

कोणत्या वर्गात, शिकतसे लेक।
नसे हो ठाऊक । नक्की ह्यांना ! ॥ ७ ॥

पुढलिया जन्मीं, भक्कम दे स्मृति।
नांवें तरी चित्तीं। राहूं देत ॥ ८ ॥

ऑफिसांत ‘मेली’, टाय्पिस्ट कारटी।
नजर चोरटी। तिच्याकडे ॥ ९ ॥

पुढलिये जन्मीं, अशी दे नोकरी।
नसतील पोरी। ऑफिसांत ॥१०॥

पुढल्या तरी जन्मीं आणू देत वेणी!
मागणे चरणीं। वटराजा!! ॥११॥

⚜ ⚜ ⚜

४२.

## " आधुनिक लक्ष्मण "

तेंच राघवा तेंच सर्व हें ॥ धृ० ॥

रिस्टवॉच हें घालुन वहिनी
मिरवत होती नटुनी थटुनी
'तें' ही तिच्यासम, 'टिक्टिक्' करूनी।
वटवट ज्यांची कुणा न साहे
तेंच राघवा तेंच सर्व हें ॥ १ ॥

सदैव राही हृदया बिलगुनी
तीच राघवा बघ ही 'झरणी'
'उंचविती' तिज असुनी ठेंगणी
'सँडल' तर नक्कीच तेच हे!
तेंच राघवा तेंच सर्व हें ॥ २ ॥

मुखचंद्र जिचा पाहिल्या विणा
एकही न दिन मम जात सुना
'चाळिशी' सदा भूषवि नयना
कांच फुटली जरि, फ्रेम तीच रे!
तेंच राघवा तेंच सर्व हें ॥ ३ ॥

४३.

## " आधुनिक लक्ष्मी "

खेळता खेळता, ' टेबलटेनीस '
गेला बाई दीस। उडूनिया ॥ १ ॥

पाय की मोडले, दमले ग बाई।
" आयाई, उयाई " । काय करूं ॥ २ ॥

पडते मी बाई, कॉटवर कशी!
द्याहो जरा उशी । आणोनीया ॥ ३ ॥

दाबा की हो पाय । बसा पायथ्याशी
आहे खर्डेघाशी । नित्याचीच ॥ ४ ॥

नारायणा आता, ठेवा ती लेखणी
ऑर्डर ही राणी । काढीतसे ॥ ५ ॥

आणताहो घरी, गठ्ठे फाईलींचे
काम कमालीचे । पडे तुम्हां ॥ ६ ॥

कधी ना विश्रान्ती, नाही साहवत
पाहतसे अंत। ' बॉस ' मेला ॥ ७ ॥

सारा ती फाईल चेपा हें पाऊल
 कामांत बदल । हीच ‘ रेस्ट ’ ॥ ८ ॥

लक्ष्मीचे चरण, चुरा गडे देवा
 मिळेल विसांवा तेवढाच ॥ ९ ॥

म्लान का वदन, देवा असे झालें ?
 भाळावर आले । घर्मबिन्दु ॥ १० ॥

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

४४.

## आधुनिक–जलभरण

गौळणींचा मेळा आला माझ्या दारीं। आग्रह हो भारी। केला त्यांनी ॥१॥

म्हणुनि मी केली सत्वर तयारी । यमुनेच्या तीरीं । जाण्यालागी ॥२॥

हांसत खेळत उगा लचकत । चालल्या समस्त । व्रजनारी ॥३॥

रमणीय होता यमुनेचा काठ । वृक्षलता दाट । सभोवती ॥४॥

यमुनेचे जळ किती बाई खोल । थांग ना लागेल । राधेपरीं ॥५॥

झुडुपे ही तीरीं राहिली निश्चल । लपतो मिष्कील । कृष्ण कान्हा ॥६॥

पेंद्यासह तेथे कितीच गोपाळ । सोडिला हो ताळ । गौळणींनी ॥७॥

पाणी भरायचे राहिले बाजूला । खेळ आरंभीला । सकळांनी ॥८॥

नृत्यकलेमधे सारे पटाईत । आणि त्यांत साथ । बांसरीची ॥९॥

नूपुरें वाजती तालांत सुरांत । आली हो भरांत । रासक्रिडा ॥१०॥

कळलेही नाही वेळ कसा गेला । सूर्य मावळला । अकस्मात ॥११॥

कशाबशा मग भरिती घागरी । लगबग घरीं । परतल्या ॥१२॥

गोप ही निघालें घेऊनिया धेनू । वाजवितो वेणू । कृष्णकान्हा ॥१३॥

कृष्ण वदे नेतो गाई चरावया । पाणी भरावया । जाई राधा ॥१४॥

कामाचे करूनी असे हें निमित्त । चालती संकेंत । प्रेमिकांचे ॥१५॥
मन माझे रागें करी जळफळ । वर्तले नवल । तोंच तेथे ॥१६॥
यमुनेचे पाणी बनले कठिण । झाले तावदान । टेबलाचे ॥१७॥
नाहीशाच झाल्या पायऱ्या घाटाच्या । राशी पुस्तकांच्या । प्रगटल्या॥१८
झुडूपांचे साऱ्या बदलले रूप । खुर्च्यांची सुरेख । रांग होई ॥१९॥
वेळ कळावया सूर्य नाही तेथें । घड्याळ टांगते । भिंतीवरी ॥२०॥
गौळणींच्या झाल्या जरी विद्यार्थिनी । डूल तेच कर्णि । लोंबणारे ॥२१॥
तीच ती काचोळी काकणेही तीच । तीच लोचनांत । आतूरता ॥२२॥
गोप मात्र गेले बदलून पार । कॉलेज कुमार । नव्या रुपीं ॥२३॥
'पनघट' गेला झाली 'लायब्ररी' । सुट्टीतही सारीं । येती येथे ॥२४॥
'जलभरणाचे' 'जनरल रिडिंग'– झाले सारे दंग । प्रेमामाजी ॥२५॥
गोपिका त्या ह्याच, हेच अन् गोपाळ । बदलले स्थळ । संकेताचे ॥२६॥
असेच हो आले चालत हे जग । असो मग युग । कोणतेही ॥२७॥
चालणार आहे असेच पुढती । तुम्हीं मूढमति । हसणारे ! ॥२८॥

* * *

४ ५.

## “ नव्या मनूतील नवरा ” ” (दिवस रेशनिंगचे)

नव्या मनूतिल नवरा झालों, भाग्यवान मी खराखुरा।
हेवा माझा करतिल सारे, ‘ जुने नवे ’ ही पहा जरा!

आधी उठुनी पत्नीच्या, मग चहा ‘ गुळाचा ’ फक्कडसा
नेऊनि देतां अभिनय करिते, श्रमल्याचा ती सुंदरसा

“ इश्श काय पण चहा बनविला ! ” असल्या मधु वर्षावात
चहा पितो मी कसाबसा अन् लगबग जातो स्नानास

पाणी उपसुन देण्यास्तव तें करद्वय कोमल राबविणें
पसंत नाही बिलकुल माते, धिक् नवऱ्यांचे तशा, जिणें !

ऑफिस मधुनी संध्यासमयीं येतों जेव्हां परतून
सान गोजिरी गोड बालकें, ‘ ती ’ ही करते भुणभूण !

पिता–पती वा, सदनीं येता, सामसूम व्हावे सगळे
धाकही इतुका नसे चांगला ! ( बरें जाऊंद्या ते सगळें )

फिरावयाला जाता घडिभर हांसत बोलत बागेंत
‘ कटिखांद्यावर ’ घेतो बाळें, पिशवी मारून बगलेंत

सौदा करिते ‘ ती ’ भाजीचा, पिशवी धरितो मी हातीं
श्रमविभागणी करितां होती, मोठीही कामें सोपीं

रात्रीचेही भोजन करितो संगें सगळे बैसोनी
वाढण्यास ना तिज वाकवितो समतेचा मी अभिमानी !

सांगा असलें जीवन, नच का भाग्यवान मी खराखुरा ?
हेवा माझा करतिल सारे ‘ जुने नवे ’ ही पहा जरा !

* * *

४६.

## गळ्याची शपथ

('गळ्याची शपथ' काराची क्षमामागून— )

गळ्याची शपथ तुला कोडग्या । तुला कोडग्या ॥ धृ० ॥

मनीं कितीदां बेत आणिला
एकहि नाहीं धडा तुज दिला
नकोस जाऊं असा हुरळुनी ! इथे तुला रे दगा ॥ १ ॥

वेळ घाईची तूंच पाहिली
हसुनी 'ही ही,' दांत दावुनी
नको घुटमळू असा छचोरा ! दिसेल शोभा जगा ॥ २ ॥

इलाज हरले, यत्नही हरले
एकच साधन 'पदांत' उरलें
पुन्हा बोल तर लाघट भाषा, तोच तया तोडगा ॥ ३ ॥

४७.

## गडे मी आले माझ्या घरीं

( ' मुली तू आलीस आपल्या घरी ' कर्त्यांची क्षमा मागून— )

लिंबलोण उतरतां कशाला होईन मी बावरी
गडे मी आलें माझ्या घरीं ! ॥ धृ. ॥

सदनीं पहिले पाऊल पडता
सासुबाईंची जाईल सत्ता
बसा हरिहरि म्हणतची आता
" *पंचावनची " सून असे मी ' ठकी, यमी ' न लाजरी ॥ १ ॥

घरीं न राह्यची, ऑफिस म्हणुनी
डबा पाठवा वन्सं भरूनी
संध्याकाळीं येता दमुनी
ठेवण्याला विसरूं नका हो, फक्त ' चहा , तो तरी ॥ २ ॥

हुकुमाची मी राणी राजी
गुलाम होणे " तिकडे " सहजी
गुंडाळा गाशा मामांजी
' आश्रमाला ' जाण्या +' चवथ्या ', वेळ हीच साजरी ॥ ३ ॥

* पंचावन सालातली. + संन्यासाश्रम.

४८.

## एकदां काय झालं !

लग्न सोहळा अपूर्व होता दरबारी थाट
बँड चौघडा, हारतुरे अन् दीप लखलखाट

मंगलाष्टकें म्हणावयाची झाली सुरवात
शुभमंगल सावधान घुमले कानाकानांत

अडखळले, थांबले उपाध्ये क्षण झाले शांत
' गुरुदेवा हें काय जाहलें ? जन चिंताक्रान्त !

भटजी उवाचः—

मंगलाष्टकें म्हणावयाचे विसरलोच आम्हीं
प्रथाच कारण जिथेतिथे ती म्हणणे महिलांनी !

* * *

४९.

## सासर—माहेर

माहेरासी जातां मला आम्रवृक्षाची ये ऐट
परि सासरीं नसते जणू ल्व्हाळ्याचे बेट
माझ्या तोंडाची रेकॉर्ड वाजे अखंड माहेरी
परी सदैव अधरा लागे कुलूप सासरी
माहेरींच्या वाड्यातून फिरताना होते 'शेर'
परी सासरी जाताच 'ताटाखालचे मांजर'
होते मोकळेचाकळे 'नवकाव्य' मी माहेरी
मात्रा-यमक बन्धनी होते 'सुनीत' सासरी
माहेरी मी वागडते जशी अल्लड हरिणी
शांत गंभीर, सासरी-जणू चंद्राची रोहिणी
जरी सासरी माहेरी असें पडतें अंतर
परि घरीं परताया मन होतसे आतूर

५०.

## ‘ व्हिटॅमिनें खा व्हिटॅमिनें ’

ऐका ऐका कान देऊनी, व्हिटॅमिनें खा, व्हिटॅमिनें
ए, बी, बीवन्, बीटू, सी, डी, व्हिटॅमिनें खा व्हिटॅमिनें ॥धृ०॥

व्हिटॅमीन ‘ ए ’ खूपखूप खा, कोबी गाजर मिरच्यांत
पालेभाज्यांमधे असे जे, दूध लोणी इत्यादींत
फुप्फुसे तुमची शक्तिवान मग, पोलादाची होतील
डोळ्यांना *‘ आरशी ’ कशाला ? नयनें S‘ उत्पल ’ बनतील

‘ बेरी बेरी ’ रोग महा
मार्ग टाळण्या एक अहा
व्हिटॅमीन ‘ बी ’ खात रहा

भात, भाकरी, आमटींत जे—नको त्यांस संपत्तीधनें
ए, बी, बीवन्, बीटू, सी, डी, व्हिटॅमिनें खा, व्हिटॅमिनें ॥१॥

हवी कशाला स्नो अन् पावडर, साबण द्याहो फेकून
व्हिटॅमीन ‘ सी ’ खाल जरा जर, त्वचा मृदुल हो हटकून
त्यासाठी खा, रसाळ ऐशी फळें, पपनसें डाळिंबें
संत्रीं केळीं आणि मुसंबीं, सर्वोत्तम तर हीं लिंबें

‘ रिकेट्स् ’ पासूनी दूर सरा
हाड पेर मजबूत करा
व्हिटॅमीन ‘ डी ’ खात रहा

दूध पिवोनी, सूर्यप्रकाशीं फिरायास जा मौजेनें
ए, बीवन्, बीटू, सी, डी, व्हिटॅमिनें खा व्हिटॅमिनें ।।२।।

* चष्मा S कमळ

५१.

## ' सद्गुण सुधा '

[ ' सद्गुण सुधा ' कर्त्याची क्षमा मागून ]

' टकळी ' कोणाची ?
अमुच्या मंत्र्यांची
सूत न कातायाची, गड्यांनो केवळ तोंडाची ! ॥ १ ॥

' भरारी ' कोणाची ?
कवि–महाशयांची
कुठेही नेउन आदळती जे ' गाडी कल्पनेची ' ! ॥ २ ॥

' भाग्य ' कोणाचे ?
' छोटू ' रावांचे
चुकुनि न ज्यांना गोळी लागे, त्या ' धनंजयांचें ! ' ॥ ३ ॥

' कमाल ' कोणाची ?
सुंदर नारींची
मुठींत एका पतिला धरिती, दुजींत शेंडी त्याची ! ॥ ४ ॥

' शौर्य ' कोणाचें ?
शेटे बनियांचे
पै–पैस्तव प्राण पणाला लावून लढण्याचे ! ॥ ५ ॥

विक्रम कोणाचा ?
सिने-निर्मात्यांचा
ब्रह्मदेवही मूर्च्छित होई 'खेळ' बघुनी ज्यांचा ॥ ६ ॥

रत्नें आणिक किती
भारतांत असती
रस्तोरस्तीं सहज हिंडता, कुणास ही दिसती ! ॥ ७ ॥

रत्नांची खाणी
ही भारत जननी
वर्णाया ती दुर्बळ केवळ आमुची ही वाणी ! ॥ ८ ॥

* * *

५२.

## ' खाणावळ '

[ 'रानांत सांग कानांत ' कर्त्याची क्षमा मागून ]

कानांत ऐक पानांत काय रे मिळते। अन् कसे अम्हाला गिळतें।
पाण्यांत शिळ्या लोण्यांत घाण दरवळते । हळू हळू मूर्च्छना येते ।
आमटी कशी चोखटी धुरानें नटते । ती कढी सदाची फुटते ।
ज्या क्षणिं चटणी जाऊनि घशाला भिडते । हा हाय, काय जें होतें ।
करपला रोडगा भला, भूकही पळते । पोटांत कसे मळमळतें ।
हा भात पाडितो दात चारुनी गोटे । जावे न तयाच्या वाटे ।
ती रांग मुंगिची फेर धरोनि फिरते । उठण्याची वेळ तों होते ।

५३.

## ‘ इतरांशीं काय ? ’

सौंदर्याची खाण खरोखर बाला सुकुमार ।
बुद्धिमान ही तशी खिलाडू कूळशीळ थोर ।

नियोजिला वर अपुला आपण नव्हता तोलाचा ।
विचार नाहीं मुळिही मानिला माता पितयांचा ।

“ सासू आणि श्वशुर नणंदा त्यांचें मज काय ?
पसंत प्रियकर ! करावयाचे इतरांशीं काय ? ”

लग्न होउनी सुयोग्य वेळीं पुत्ररत्न झालें
श्वशुरावाणी रूप सावळे अन् डोळे तिरळे !

आजीसम बछड्याच्या नाकीं गज ठेवी पाय !
हाय ! कळालें करावयाचें ‘ इतरांशीं काय ! ! ’

५४.

## ' झुरळाचें भावगीत '

झुरळ असे मी एक मृत्युच्या पंथाला लागलों ।
करोनी विचार बहू भागलो ।
अखेर म्हटले गाऱ्हाणीही मांडुनि जगता पुढें ।
पहावे सुटते का सांकडें ?

( चाल बदलून )—

तो विचार एकच नृत्य मन्मनीं करी ।
क्षण एकच बसलो असता मी फळिवरी ।
का कुणि हाणिला कुंचा हा मम शिरीं ?

( चाल पहिली )—

गरिब बिचाऱ्या अशा जिवाच्या माना मुरगाळुनी ।
लाभते काय तया पासुनी ! ॥ १ ॥

सर्वांभूतीं एकच आत्मा सांगे ज्ञानेश्वर ।
कथितसे गीतेंतही ईश्वर ।
हक्क असे हा जगण्याचा जर सर्वांना सारखा ।
मुकावे आम्हींच का त्या सुखा ?

( चाल बदलून )—

विंचवापरि का नांगी अम्हीं मारितो ?
की मत्कुणवत आपुलें रुधिर प्राशितो ?
की चिलटांपरि अम्हीं हिंवताप आणितो ?

( चाल पहिली )—

बोला बोला, जाब द्या अता प्रश्नाचा लवकरी
का असे छळिता शत्रूपरी ! ॥ २ ॥

अपघातीं मृत्युमुखीं पडता एखादा नरमणि
गवगवा होत किती या जनीं !
परि आमुच्या प्राणाची हो पर्वा नाहीं कुणा
शेकडो मरतो अम्हीं दरक्षणा !

( चाल बदलून )—

तर विचार याचा करूनि एकदां पहा
परि असे प्रभूची कृपा अम्हांवर अहा !
म्हणुनीच असे उत्पत्ति आमुची महा !
कितीही आणखी कशीहि मारलीत झुरळें तुम्हीतरी ।
राहतिल सदैव ती भूवरीं ! ! ॥ ३ ॥

* * *

५५.
# कोडें

[ राजकवि कै. तांबे यांची क्षमा मागून ]

कुणि कोडे माझे उकलिल का ? ॥ ध्रु० ॥

चिंताढग ' मम ' शिरीं डवरला
कडकडते ' तव ' वदनीं चपला !
वाणी–निर्झर ' तव ' खळखळता
होई कसा मी सहज मुका ? ॥ १ ॥

गृहकृत्यें ' मी ' करिता सदनीं
काया दिसते ' तव ' शिणल्यापरी !
बंदा असता सेवक ' मी ' तव
बंदिवास तुज गमतो का ? ॥ २ ॥

राग कधीं ' मज ' चुकुनी ! आला
रंग ' तुझ्या ' नाकावर चढला
पगार येता खिशांत ' मम ' परी
खळी ' तव ' गालीं कोमल का ? ॥ ३ ॥

* * *

५६.

# इंदूचें लग्न

[ कवयित्रीनें वयाच्या ८ व्या वर्षीं केलेले पहिलें वहिलें काव्य. यातील पहिली ओवी—जुन्या ओव्यांतून घेतलेली आहे. ]

" बोहल्यावर पडे ऊन । शेल्यानी ग झाकी सून । "
नांव ठेवियले इंदु ! जिकडे तिकडे झाला आनंदु ।
हिऱ्यांची ग घाली कुडी । जरतारी नेसे साडी ।
गोठ, तोडे, घाली वाकी । लफ्फेदार नथ नाकीं ।
चंद्रहार, पोत, कंठी । बोटांमध्यें छान अंगठी ।
पायामध्यें घाली तोरड्या । कानांवर घाली बुगड्या ।
सोनियाचा कंबरपट्टा । इंदुताईचा नट्टापट्टा ।
इंदु वाढतसे तूप । सासुबाईंना कवतुक ।
वरात हो आली घरीं । सगळ्यांना पानसुपारी ।
विडे, अत्तर, गुलाबपाणी । उसाचा रस, थंडपाणी ।
इंदुताईचे लगीन झाले । आईचे हो डोळे ओले ।

* * *

५७.

## पावसाळा

आला अहा पावसाळा । टवटवी पानांवरी
जशी पाहुणे जाताच । गृहिणीच्या तोंडावरी ॥ १ ॥

आला अहा पावसाळा । ओढा खळखळ करी ।
जसा नव्या दंपतीचा । उल्लुपणा घरींदारीं ॥ २ ॥

आला अहा पावसाळा । भुंगे फुलांच्या भोंवतीं ।
जशी वैभवाच्या काळी । आप्त–स्वकीयांची दाटी ॥ ३ ॥

आला अहा पावसाळा । ‘ नगा ’ पर्जन्याचा मार ।
जसा पत्नीचा बापुडा–‘पती’ सोशी भडिमार ॥ ४ ॥

आला अहा पावसाळा । हवा झाली गारेगार ।
अमेरिकेनें धाडिले ? अम्हां मोतियांचे सर ? ॥ ५ ॥

* * *

५८.

# “ महत्त्वाकांक्षा ”

जादूगार डोळे तुझे । सखे बदामी, विषारी ।
वाटे ‘ गॉगल ’ होऊनी । सदा बसावें त्यांवरीं ॥ १ ॥

केस नाग, बटा भुंगे । काळेशार रुळतात ।
रिबीनीचा ‘ बो ’ होऊनी । वाटे झुलावे मजेंत । ॥ २ ॥

वाटे वक्षि विसावावे । पेन होऊनी लाडके ।
किंवा सँडिल होऊनी । पाय सेवावे नेटके । ॥ ३ ॥

गुलाबाचीं फुलें जणूं । हात तुझे गोरेगोरे ।
वाटे गोंजारुन घ्यायां । जावे होऊनि ‘ पोतेरे ’ । ॥ ४ ॥

* * *

# भाग ४ था

# माझ्यासाठीं

५९.

# ‘ ताईची आठवण ’

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९९२३५

[ माझ्या आईला, ताई म्हणत असत. ती कालवश होऊन ज्या दिवशीं वर्ष झालें, त्या दिवशीं रचलेली कविता. ]

माता अशी दैव योगेच लाभे, अम्हां लाभली धन्य झालो जगीं
माता स्वतःची, न केली म्हणोनी स्तुति–योग्य ना जी असे वावुगी

ताई ! अम्हां त्यागिले वर्ष झालें ! कुणी घातला बांध काळास या
वाहे असा आदिपासून अंताकडे लागली ओढ जाया जया.

ती वेळ छे ! आठवू ना शके मन्मति जाहली कावरीबावरी
काळीज काळा किती क्रूर तूझे, कवि कल्पना ही पडेना पुरी !

नेली हिरावून ती गोड वाणी, अखेरीस दृष्टि तशी प्रेमळ
नेलेच ते सूत्र ओढून नेलें, गळालीं फुलें* पांच ही कोमल !

झाली सुकन्या, सुदारा, सुमाता, जगां अर्पुनी पांच ही लेकरें
ती थोर हो कार्यकर्ती समाजीं—जियें सुप्रजेसी अशा निर्मिले।

धावून गेली सदा संकटीं, साह्य दे जागुनी धर्म हा मानवी
तो रंक वा राव, तो दीन वा थोर, सर्वांसही सारखी लाघवी

ठेवून आदर्श ताई तुझाची पुढें चाललों आयुमार्गावर
उणे काय अम्हां ? अशिर्वाद आहे तुझा पाठीशी या जगीं जोवर !

✤ ✤ ✤

* ( पाच फुलें म्हणजे कवयित्री व तिचीं चार भावंडे )

६०.

## आरोग्य हें धन

[ माझा मुलगा चि. उल्हास, हा ‘ स्त्री ’ मासिकानें ठेवलेल्या, लहान मुलांच्या आरोग्य स्पर्धेंत १ ला आला, तेव्हां त्याच्या बक्षिसाच्या रकमेंत आम्हीं एक पितळेची बादली व तपेली घेऊन, त्या बादलीवर पुढील ओव्या कोरून ठेवल्या. चि. उल्हास आठ महिन्यांचा होता. ]

आरोग्य स्पर्धेंत, पहिला आलास ।
मिळालें बक्षिस अर्थ रूपें ॥ १ ॥

घेतली तयाची बादली तपेली ।
बैसण्याचा जलीं । षोक तुला ॥ २ ॥

नित्य करिता स्नान । ठेव आठवण ।
‘ आरोग्य हें धन । आयुष्याचें ॥ ३ ॥

* * *

६१.

## उल्हासच्या ओव्या

उल्हास ‘ बालरवि ’ घरांत उगवला ।
प्रकाश सामावला । डोळ्यांमाझी ॥ १ ॥

संसार ‘ नंदनांत ’ ‘ उल्हास ’ माझा खेळे ।
*‘ वसंत ’ सदा फुलें । तया संगें ॥ २ ॥

संसाराच्या आकाशांत । ‘ उल्हास ’ चांदतारा ।
देई आल्हाद अंतरा । माऊलीच्या ॥ ३ ॥

केलं ‘ बोरन्हाणं ’ । हलव्याचं लेणं ।
करा ‘ औऽक्षण ’ । उल्हास बाळा ॥ ४ ॥

हिरा जरी तेजवान । शोभा वाढे कोंदणानें ।
खुलविते बाळ लेणे । उल्हास बाळा ॥ ५ ॥

ध्येयावर रोखिलेसी । जणू डोळे गमताती ।
पाय बाळाचे दिसती । पाळण्यांत ॥ ६ ॥

( * उल्हासच्या वडिलांचें नांव )

पाट रांगोळ्यांचा थाट । पक्वान्नांच्या नानापरी ।
उष्टावण मामा घरीं । उल्हासाचे ॥ ७ ॥

सानथोरांचा लाडका । बाळ माझा बहुगुणी ।
किती गाऊ रोज गाणीं ? उल्हास बाळा ॥ ८ ॥

* * *

६२.

# ती. जनूभाऊस

[ माझे मोठे बंधू श्री. जनूभाऊ सोहोनी, यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त केलेली कविता. आम्ही पांच भावंडें, सर्वांत मोठे बंधू आबा सोहोनी, दुसरे जनूभाऊ, तिसरे दामोदर सोहोनी, चवथी सौ. चंद्रिका रानडे आणि पांचवी मी स्वतः ]

[1]ताई [2]नानांच्या कृपेनें आम्हीं भाग्यवंत झालो
' कर–पुष्पाच्या ' साजिऱ्या पंचपाकळ्या शोभलो

' अंगुठा ' हा जनुभाऊ खरा द्योतक ' [3]शुक्राचा '
पुतळा हो लावण्याचा तसा कलाकौशल्याचा

बोट [4]गुरूचे जाहले आबाराव धर्मराज
मोठेपण सार्थ केले, सदा दुसऱ्यांचे चोज

बोट मधलें शोभलें दामुअण्णा हे उंचाडे
पहा सर्व भावंडांचा ओढा कसा ह्यांच्याकडे

' अनामिका ' ही चंद्रिका तिला अंगठीचा मान
आहे सात्त्विक, शहाणी, पांच बोटांसी भूषण

ठेंगणी ही करांगुली करी उगा लुडबूड
लहानचि व्हावे म्हणे [5]अंबूताई ही लबाड !

पांच बोटें ही डौलानें उभी जोंवर शेजारी
तमा नुरेच कशाची, पृथ्वी कर्तृत्वा अपुरी

सज्ज सदा राहतील परहित साधण्याला
प्रभू मिरवील शिरीं पांच पाकळ्यांच्या फुला !

१ कवयित्रीची आई. २ कवयित्रीचे वडील. ३ हस्तसामुद्रिकांत अंगठा हा शुक्राचा द्योतक आहे आणि शुक्राचे गुण कलाकौशल्य व लावण्य हे आहेत. ४ हस्तसामुद्रिकांत तर्जनी ( अंगठ्याजवळचें बोट ) हे गुरूचे बोट मानतात. ५ कवयित्रीचे माहेराचे नांव.

६३.

## चि. स्वाती परांजपे हीस शुभाशीर्वाद

[ माझ्या बंधूंची नात, ५ वर्षांची झाली तेव्हां केलेली कविता. ती कलकत्त्याला, ' काचडापाडा ' भागांत रहात होती. ]

सुंदर छोटे गांव ।
  त्याचे ' काचडापाडा ' नांव ।

हिरवी झाडी दाट ।
  गेली मधून पाऊलवाट ।

छोटे तेथे घर ।
  त्याला गुंजाचे छप्पर ।

गोऱ्या गोऱ्या पान ।
  त्यामध्यें बहिणी दोघी सान ।

शहाणी ती स्वाति ।
  दुसरी शहाणी वासंती ।

वाढदिस आहे स्वातीचा ।
  झोक पण दिसतो दोघींचा ।

आज जरी छोट्या ।
  व्हा तुम्हीं खूपखूप मोठ्या !

* * *

६४.

## देवाचे ऋण

काय मी जोडिले गेल्या जन्मीं पुण्य !
देवा देसी दान । म्हणूनि हे ॥ १ ॥

लाभे पतीदेव, आनंदी सदैव ।
सांबसदाशिव । मूर्तिमंत ॥ २ ॥

एकुलता एक । दिधलासी लेक ।
काय कवतूक । सांगू त्याचे ॥ ३ ॥

मातृपितृभक्त, हळव्या मनाचा ।
आहे रे गुणाचा । बाळ माझा ॥ ४ ॥

मिळायाचा नाही, नवस करोनी ।
माझा कंठमणि । 'उल्हास' हा ॥ ५ ॥

पाठीराखे माझे । तीन बंधूराज ।
भाग्य लाभे मज । मुक्ताईचे ॥ ६ ॥

सासरीं प्रेमळ । दीर दिले तीन ।
जानकीचे पुण्य । गाठीं माझ्या ॥ ७ ॥

गांव ही दिलेसी। 'पुण्या' परी देवा।
कुठे अशी 'हवा'? सांग दुजी? ॥ ८ ॥

"चंद्रकिरणांत"। जागा ही झकास।
आणि शेजारास—'भीडे' लोक ॥ ९ ॥

स्वामिभक्त तसे। चाकर इमानी।
मानीती हो धनी। देवासम ॥ १० ॥

कसे फेडू ऋण। सांग तुझे देवा?
वाटे मला हेवा। आपुलाची ॥ ११ ॥

* * *

# भाग ५ वा

# महाराष्ट्रासाठीं

६५.

## ‘ श्री महाराष्ट्र गौरव गीत ’

**निधडी छाती, निस्पृह बाणा, लववी ना मान ।**
**अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ धृ० ॥**

प्रिय अम्हांला अमुची भूमि, असुंद्या खडकाळ
उघडे अन्‌ वैराण आमुचे प्रिय आम्हां माळ ।

अम्हांस ठावे इथेच येती ‘ समर्थ ’ जन्माला
पाषाणांतुनि प्रगटविती जे ‘ कुबडी–तीर्था ’ ला !

कडेकपारीं खेळवि अम्हां सह्यगिरी–तात
रक्षित आला, रक्षित राहिल, सोडिल ना साथ

तयेंच केले कणखर अम्हां दिसलों जरी सान
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ १ ॥

* * *

तरवारीवर पाणी चढवी कृष्णेचें पाणी
गोदेंतून ह्या अखंड वाहे संतांची वाणी

इंद्रायणीनें अहा तारिली तुकयाची गाथा
सान जरि ह्या, सदैव अमुच्या पूज्य अम्हां सरिता

देशावरती भाकरकांदा खाऊं शेतांत
कोकणांत ना कमी कुणाला भाजी आणि भात

रत्नांगिरीचा हपुस असे हो अमुचे वरदान
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ २ ॥

* * *

वनदेवीला फार आवडे कोंकणची भूमि
सागरराजा साथ करी तिज गाऊनिया गाणीं

लालमातीवर शोभे राई हिरवी घनदाट
कूजति मंजुळ रंगदार हे सृष्टीचे भाट

देशावरच्या प्रसिद्ध भगिनी बाभुळ आणि बोरी
त्या बोरींना पुनीत करण्या इथेच हो शबरी

'श्रद्धेनें हो सुसह्य जीवन' दे मौलिक ज्ञान
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ३ ॥

* * *

'सुजला, सुफला, सस्य श्यामला' विदर्भ-भू शोभे
शुभ्र कपाशी कशिदा वरती जीव अहा लोभे

कवळा कवळा हुरडा इथला एकदांच खाल
विदर्भास या, विसरूं म्हणुनी कधी न विसराल

क्रमांक ............ नों: दि: ............

विदर्भदेशीं इंद्र राहिले येऊनि स्वर्गींचे
अमरावती स्थापिली, तीमधे देऊळ अंबेचे

रुक्मिणीस त्या प्रसन्न झाले तेथे भगवान
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ४ ॥

* * *

स्वातंत्र्यास्तव आणि धर्मास्तव लढला झुंजार
अतुल धोरणी राजा अमुचा शिवबा रणधीर

घोड्यावरूनि कधि न उतरला बाजीराव शूर
पुण्यांत असता बसे दरारा दिल्लीसही दूर

टिळक प्रकाशे दिपुनी गेला, आंग्ल अहा बदला
" एकच माणुस देखियला नच लाचेनें बधला "

सावरकर तर हिंदुत्वाचा ज्वलंत अभिमान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ५ ॥

* * *

उग्र घेउनी रूप पेटता कलहाचा वन्ही
संत धावले शान्तीरसाचे घेऊनिया पाणी

ज्ञानदेव अन् तुकया, नामा, दास, एकनाथ
ज्ञानेश्वरीसम रचिले ज्यांनी अद्भुत हो ग्रंथ

स्त्रीउद्धारक तसे सुधारक प्रथम इथे झाले
आगरकर, गोखले रानडे, अण्णा अवतरले

पाणीदार ह्या ललना म्हणुनी ताठ सदा मान
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ६ ॥

* * *

सरस्वतीचे पुण्यास आहे अमुच्या माहेर
पंढरपुर ना कुणास ठावे ? तीर्थांचें सार

‘ दक्खन काशी ’ कोल्हापुर हें खरें कलापूर
आंतरराष्ट्रीय कीर्ति पावले किती कलाकार

प्रिय अम्हाते असे मुंबई प्राणाहुनि खास
महाराष्ट्राला घेणे मुष्कील तिजविण की श्वास

–‘ जगामधील हो एक ’–मिळाला असा जिला मान
अशा आमुच्या महाराष्ट्राचा आम्हांस अभिमान ॥ ७ ॥

* * *

साधेभोळें जीवन अमुचे साधें हें अन्न
माणुसकीला जिवन्त ठेवी अमुचे हें दैन्य

नसानसांतुनि अमुच्या खेळें इमान बाजीचे
त्यागाचे अन् शुचित्व देहीं त्या तानाजीचे

दा. क्र. ११२३५ ... शाखा ... प्रत

हांजी हांजी न रुचे अम्हां, न रुचे अन्याय
हुकूमशहाच्या माथ्यावरती ठेवूं अम्हीं पाय

बुद्धिची तरवार न ज्यानें केली कधि म्यान
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ८ ॥

* * *

**निधडी छाती, निस्पृह बाणा, लववी ना मान ।**
**अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हास अभिमान ॥ धृ० ॥**

**— समाप्त —**

REFBK-0011235
REFBK-0011235

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
... वि: ...
अनुक्रम ... नों: दि: ...
क्रमांक ...